उत्तरार्ध

# माजिस्त्रालेमधें तुम्हीहि नापास होतां, पण.....

## इंग्लंड

**खरी परीक्षा** माझ्या परीक्षेंत मी पास झालों. माध्यमिक शाळा सोडली. आणि मी इंग्लंडला गेलों. मी पंधरा वर्षांचा होतों. पहिल्यांदां मी कँटरबरींत एका शेतकऱ्याकडे काम केलं. नंतर लंडनमधें एका दारूच्या व्यापाऱ्याकडे.

परदेशीं जाण्याचा अनुभव हा आमच्या शाळेमधें तुमच्या परीक्षांची जागा घेतो. पण खरं तर परीक्षा आणि शाळा – दोन्हींहि त्यांत एकत्र गुंफल्या जातात.

आमची संस्कृति आम्हीं प्रत्यक्ष जीवनामधून पारखून घेतों.

आमची शेवटची परीक्षा तुमच्या त्या परीक्षेपेक्षां कितीतरी कठिण असते. पण त्यांत आम्हीं निदान भूतकाळांतल्या मेलेल्या गोष्टींवर वेळ वायां घालवत नाहीं.

**सुएझ** माझी परीक्षा चांगली झाली. मी जिवंत घरीं परतलों. आणि बरोबर थोडे पैसेहि कमावून आणले. सगळ्यांत चांगलं म्हणजे मी परत आलों तो नवनवीन अनुभवांनीं ओसंडून जात. त्यांचा अर्थ मला समजला होता. आणि ते मला पुन्हां सांगतांहि येत होते.

या आधीं आमच्या कुटुंबांत फक्त माझा काका रेनातो परदेशीं गेलेला होता. तो इथिओपियांत युद्धावर गेला होता. लहानपणीं भूगोल शिकायला सुरवात केली तेव्हां ‘सुएझ कालव्याबद्दल मला कांहीं सांग’ असं मीं त्याला म्हटलं. पण तो कालवा आपण ओलांडला होता हें त्याला माहीतच नव्हतं.

**शांततावादी** त्याच्यासारखं शेतकऱ्यांना मारण्यासाठीं मला परदेशीं पाठवायला तुम्हांला कधींच जमणार नाहीं. मी परदेशीं गेलों आणि एका शेतकऱ्याच्या घरांतच राहिलों तिथं माझ्याएवढाच एक मुलगा होता. आणि एक त्याच्याहून छोटी मुलगीसुद्धां. त्यांचं छोटंसं कोठार आहे. ते बटाट्याची लागवड करतात. आमच्यासारखेच ते राबतात. मी त्यांना कशासाठीं ठार मारूं?

तुम्हीं मला त्यांच्यापेक्षांहि जास्ती परके आहांत. घाबरूं नका – मी शांततावादी आहें!

**कॉकनी** लंडनमधें तर मजुरांची अवस्था शेतावरच्यांपेक्षां पण खराब आहे. आम्हीं शहराच्या मध्यमार्गीं जमिनीखालीं काम करत होतों – भरलेले ट्रक रिकामे करायचे. माझे सहकारी कामगार इंग्रज होते, पण त्यांना इंग्रजीतून साधं पत्रदेखील लिहितां येत नव्हतं. ते बऱ्याचदा डिककडून लिहून घ्यायचे. डिक कधींकधीं माझा सल्ला विचारायचा. मी तर ध्वनिमुद्रिकांवरून इंग्रजी शिकलेलों. तरीसुद्धां तोहि इतरांसारखा फक्त ‘कॉकनी’च बोलायचा.

आमच्या डोक्यावरतीं फक्त पंधरा फुटांवर ‘राणीचं इंग्रजी’ बोलणारे लोक होते.

कॉकनी कांहीं फारशी वेगळी नाहीं. पण ती बोलणं म्हणजे एक वेगळेपणाचा शिक्का बसणं. इथं इंग्रज लोक शाळांत विद्यार्थ्यांना नापास करत नाहींत. ते त्यांना खालच्या दर्ज्याच्या शाळांकडे वळवतात. मग शाळेंत जेव्हां श्रीमंत लोक आपल्या भाषेला घासून-पुसून चमकदार करत असतात, तेव्हां गरीब लोक वाईट रीतीनं बोलण्याच्या कलेंत पारंगत होत असतात. माणसाच्या बोलण्याच्या धाटणीवरून तो श्रीमंत आहे का आणि

त्याचे वडील कोणता व्यवसाय करतात हें त्यांना सांगतां येतं. क्रांति आली रे आलीं कीं अगदी सहजपणानं ते एकमेकाची आंतडीं बाहेर काढतील.

**भिंतीवर धडक** मी इटालीला परतलों तेव्हां आपण भित्रे-बुजरे होतों हें मी विसरूनहि गेलों होतों.

देशांच्या सरहद्दींवर उभं राहून आपलं म्हणणं समजावण्याचा प्रयत्न करणं, राजसत्तेच्या पुरस्कर्त्यांबरोबर आणि मालकाबरोबर वाद घालणं, वंशवादी आणि समसंभोगी माणसांपासून स्वतःचा बचाव करणं, पैसा जपणं, निर्णय घेणं, अनोळखी अन्न खाणं, पत्रांची वाट पाहणं, घराच्या आठवणी गिळून टाकणं : आपण प्रत्येक वेळींच झुंजलो आहोंत आणि प्रत्येक लढाई जिंकली आहे असंच मला वाटलं.

पण मीं अनुभवली नव्हती अशी एक गोष्ट म्हणजे माजिस्त्राले.* आतां मीं तेंहि केलं आहे. एखाद्या भिंतीवर डोकं आपटत राहावे असा तो अनुभव होता.

**एक तुम्हीं तरी, नाहीं तर आम्हीं** आणि तरी माझे शाळकरी मित्र सगळीकडे यशस्वी झाले आहेत. त्यांच्यापैकीं कांहींजण कामगार संघटनांत पदाधिकारी आहेत आणि त्यांचं अगदीं व्यवस्थित चाललं आहे. दुसरे कांहीं फ्लोरेन्समधें निरनिराळ्या कारखान्यांतून कामाला आहेत आणि त्यांना दडपून टाकणं कुणालाहि शक्य नाहीं. कामगार संघटनांतून, राजकारणांत आणि स्थानिक प्रशासनामधें ते कामं करतात.

---

* प्राथमिक शिक्षकांसाठींचा चार वर्षांचा उच्च अभ्यासक्रम

अगदीं जे दोघं तांत्रिक शाळेंत गेले, त्यांनीसुद्धां यश मिळवलं आहे. पिएरिनोसारखेच तेहि बढती मिळवताहेत.

जिथं खरंखुरं जीवन आहे तिथं आमचं शिक्षण ताठपणं उठून दिसतं. पण माजिस्त्रालेमधें तें निरर्थक ठरतं.

काय घडलं तें जरा तपासून पाहूं या. तुम्हीं किंवा आम्हीं – आपल्यापैकीं कुणीतरी वाट चुकलेला आहे.

**रोजचं वेळापत्रक** फ्लोरेन्सला जाण्यासाठी मला रोज पहाटें पांचला उठावं लागत होतं. फटफटीवरनं व्हिच्चिओपर्यंत. तिथून पुढं आगगाडीनं. गाडींत अभ्यास करणं कठिण आहे. पेंगुळलेपण, गर्दी, गजबजाट.

मी आठ वाजतां शाळेच्या दरवाज्याशीं पोंचायचों. आणि सात वाजतां उठणाऱ्या मुलांसाठीं मला थांबावं लागायचं. दररोज चार तासांची अडथळ्याची शर्यत.

**आधींचं वेळापत्रक** मी तिथं एक ऑक्टोबरला हजर होतों. पण तुम्हीं नव्हतांत. सहा तारखेला परत या म्हणून आम्हांला सांगितलं. लिओनार्दो शाळेच्या विद्यार्थ्यांना तेरा तारखेला हजर राहायला सांगितलं.

हा सगळा उशीर तुमच्या सुस्त ऐदीपणामुळं होतो आणि आपल्याकडे पुण्यतिथ्यांना पण कांहीं तोटा नाहींच. गरिबांपासून शाळेचा एक दिवस हिरावून घेण्यासाठी अगदीं संत फ्रान्सिसलाहि सबब म्हणून वापरलं जातं.

अगोदरच उन्हाळ्यांचे चार महिने शाळेशिवाय आम्हीं काढल्यानंतर वर हें!

या आळशीपणाची जबाबदारी नक्की कुठं पडते. तें मी अजून शोधलेलं नाहीं. शाळांवर कीं अधिकाऱ्यांवर कीं शिक्षणखात्यावर? वर्षाला १३ महिन्यांचा पगार घेणाऱ्या (एक महिन्याचा पगार बोनस) लोकांचे हे सारे उद्योग!

एखादा कामगार पांच मिनिटं उशिरां आला कीं अर्ध्या तासाचा पगार गमावतो. हें वारंवार झालं तर तो आपली नोकरीसुद्धां गमावून बसतो.

तुमच्याप्रमाणंच आगगाड्यादेखील सरकारच्याच अधिकारांत आहेत. पण त्या सतत चालूंच असतात. रेल्वेचे रूळ आपल्याला अगदीं निश्चितपणानं ओलांडतां येतात. कारण सिग्नल देणारे कामगार कामावर हजर असतात. उन्हाळ्यांत आणि हिंवाळ्यांत, दिवसां आणि रात्रीं. त्यांच्यापैकीं एखाद्याकडून एकदां जरी का चूक झाली तरी साऱ्या वर्तमानपत्रांतून गाजावाजा होईल. कामाच्या विभागणीच्या किंवा पोराचं पोट दुखत असल्याच्या सबबी त्याला देतां येत नाहींत. त्याला सरळ तुरुगांत टाकलं जातं.

मग तुम्हीच असे कोण एवढे मोठे लागून गेला आहांत?

कदाचित् आगगाड्या शाळांपेक्षां व्यवस्थित चालणं कारभार करणाऱ्यांना जास्ती निकडीचं वाटत असावं. आपल्या स्वतःच्या मुलांना घरच्या घरींच शिकवण्याची बरोबर व्यवस्था आहे हें त्यांना माहीत आहे. पण आगगाड्या ही वेगळीच बाब आहे.

पदव्या द्यायला जूनमधें तुम्हीं तयार राहावं एवढीच काय ती फिकिर वरिष्ठांना असते.

## आत्मघातकी निवड

**विसराळू** नापास करून बाजूला टाकलेल्या मुलांचं केवढं मोठं नुकसान तुम्हीं केलेलं आहे तें दाखवायचा प्रयत्न आम्हीं या पत्राच्या पहिल्या भागांत केला. फ्लोरेन्समधें मीं पाहिलं कीं डॉन बोर्धींचं अगदीं बरोबर होतं. सगळ्यांत जास्ती नुकसान केलं गेलं तें त्या निवडक मुलांचंच.

पास होणारं मूल त्याच वर्गाबरोबर राहतं. त्याच्या शिक्षकांपेक्षांसुद्धा कायम तें तिथं डकवलं जातं. त्याला खरं तर आपल्या शाळासोबत्यांबरोबर मैत्री करतां यायला हवी आणि त्यांचं पुढं काय होतं यांत रस वाटायला हवा.

पण ते संख्येनं इतके असतात! आठ वर्षांत चाळीस शाळासोबती त्याच्यापासून तोडले जातात. जणूं सुकलेल्या फांद्यांसारखे ते जळून गेलेले असतात. माध्यमिक शाळेच्या अखेरीला आणखी पांचजण गळलेले असतात – पास होऊनदेखील. म्हणजे एकंदर झाले ४५. त्यांच्याबद्दल किंवा त्यांच्यापुढच्या प्रश्नांबद्दल कधींच कांहीं पिएरिनोच्या कानांवर येत नाहीं.

**उद्धट** दुसऱ्या यत्तेंत असतांना पिएरिनो अनेक मुलांपैकीं एक होता. पांचव्या यत्तेंत तो जास्ती छोट्या गटामधें जातो. एव्हांना त्याला भेटलेल्या शंभर मुलांपैकीं चाळीस केव्हांच त्याच्याहून 'खालची' झालेलीं असतात.

तो माध्यमिक शाळा सोडतो तेव्हां त्याच्या 'कनिष्ठां'चा आंकडा शंभरांतल्या नव्वदाइतका वाढलेला असतो. त्याच्या उच्च शाळा पदविकेनंतर हाच ९६ होतो. त्याच्या महाविद्यालयीन पदवीनंतर ९९.

नाहींशा होणाऱ्या ह्या शाळासोबत्यांच्या प्रगतिपुस्तकांतल्या मार्कांपेक्षां दरच वर्षी जास्ती मार्क त्यानं आपल्या प्रगतिपुस्तकांत पाहिलेले असतात. हे मार्क देणाऱ्या शिक्षकांनीं इतर ९९ खालच्या संस्कृतींतले आहेत असा ठसा त्याच्या मनावर खोदून ठेवलेला असतो.

एव्हांना त्याचं मन पांगळं झालेलं नसलं तरच नवल!

**गरिबांना भरपाई** त्याचं मन खरोखरच रोगट झालं आहे. कारण त्याचे शिक्षक त्याच्यापाशीं खोटं बोललेले आहेत. त्या ९९ जणांची संस्कृति नीच नाहीं – ती वेगळी आहे.

खरी संस्कृति दोन घटकांची मिळून बनलेली असते. बहुजन-समाजाबरोबरच असणं आणि भाषेवर प्रभुत्व असणं. कुणाहि माणसाला ही संस्कृति अजून मिळवतां आलेली नाहीं.

आम्हीं वर्णन केलेल्या प्रकारची भेदभाव करणारी शाळा संस्कृतीला मारून टाकत असते. ती गरिबांपासून स्वतःचं मनोगत उघड करायचीं साधनंच हिरावून घेते. तशीच ती प्रत्यक्षांत गोष्टी जशा आहेत तशा समजून घेण्याचं ज्ञान पण हिरावून घेते.

दुर्दैवी गियानी! त्याला स्वतःचं मन उघड करतां येत नाहीं. सुदैवी गियानी! कारण तो सगळ्या जगाचा आहे – सगळ्या आफ्रिकेचा, आशिया आणि लॅटिन अमेरिकेचा भाऊ. जगांतल्या बहुसंख्यांच्या गरजांचा जाणकार.

पिएरिनो नशीबवान. कारण त्याला बोलतां येतं. अभागी. कारण तो फार बोलतो. पण त्याच्यापाशीं सांगायला महत्त्वाचं असं कांहीं नाहीं. त्याच्याचसारख्या असलेल्या दुसऱ्यांनीं लिहिलेलीं पुस्तकं तो वाचतो. आणि फक्त त्याच त्याच गोष्टी

पुन्हां पुन्हां बोलून दाखवतो. इतिहास नि भूगोलापासून तो तुटलेला आहे. छोट्याशा संभावित वर्तुळांत तो कोंडलेला आहे.

भेदभाव करणारी शाळा म्हणजे ईश्वर आणि माणसाविरुद्धचं पाप आहे. पण ईश्वर दुबळ्यांचा पाठिराखा आहे. तुम्हांला ते मुके असायला हवे आहेत. आणि म्हणून ईश्वरानं तुम्हांला आंधळं केलं आहे.

**आंधळे** ज्या कुणाचा आमच्यावर विश्वास नसेल त्यानं मात्रिकोल (विद्यापीठाचे पहिल्या वर्षाचे विद्यार्थी) समारंभाच्या दिवशीं शहरांत जावं.

या सद्‌गृहस्थांना आपल्या विशेष दर्ज्याबद्दल लाज तर वाटत नाहींच. उलट आणखी उठून दिसण्यासाठीं ते डोक्यावर हॅट घालतात. नंतर दिवसभर रस्त्यांमधें ते विदूषकी चाळे करत राहतात. अचकट-विचकट विनोद करत फिरतात. कायदे धाब्यावर बसवतात. रहदारीची अडवणूक करतात. आणि प्रत्येकाच्या कामामधें अडथळे आणतात. ते पोलिसाची टोपी काढून घेतात आणि एनिम्याच्या नळीनं त्याचं डोकं सजवतात.

हें सारं पोलिस शांतपणानं सोंसतो. त्याला आपल्या धन्याची इच्छा समजते. पण कामगार जेव्हां कासावीस करणाऱ्या गरजांपोटी संप पुकारतात – शिस्तशीर, गंभीर असा – तेव्हां त्याला मात्र बंडाळी म्हटलं जातं.

पोलिसाची ही लाचारी हा आपल्यावर ठपका आहे असं ह्या चाळे करण्यांत गढलेल्या तरुण सद्‌गृहस्थांना वाटत नाहीं.

चेहऱ्यावर एवढंसंहि हंसूं न उमटतां शेजारून जाणाऱ्या कामगाराची नजरहि त्यांच्या लक्षांत येत नाहीं. भीक मागण्यासाठीं

समोर हात पसरून त्यालाहि थांबावायला ते मागंपुढं पाहात नाहींत.

**‘ठेवलेलीं’ माणसं** करांच्या रूपानं प्रत्येक कामगार दररोज दानधर्म करतच असतो. अगदीं आमटीमधें मीठ घालतो तेव्हांसुद्धां. त्याच्या खर्चानं विद्यार्थी शिकत असतात. पण विद्यार्थ्यांना तें एकतर माहीत नसतं, किंवा माहीत करून घ्यायची इच्छा नसते.

माध्यमिक शाळेंतल्या विद्यार्थ्यामागं गरीब माणूस दरवर्षी ९८० रुपये खर्च करत असतो. विद्यार्थ्याचा बाप त्यापैकीं फक्त ९८ रुपये करांच्या रूपानं देत असतो. विद्यापीठांत शिकणारा एक विद्यार्थी म्हणजे गरिबाला दरवर्षी ३६८० रुपये मोजावी लागणारी किंमत. ह्या विद्यार्थ्याचा बाप त्यापैकीं फक्त ४४० रुपये देतो.

प्रत्येक गोष्ट विचारांत घेतली तर एका एम.डी. मागं गरिबानं ४५८६० रुपये मोजले आहेत. त्यामधें त्या डॉक्टरच्या बापाची गुंतवणूक आहे. २४४० रुपये. नंतर ही एम.डी. ची पदवी ज्या गरिबानं त्याला बहाल केलेली आहे, त्यालाच हा डॉक्टर १५ मिनिटांच्या व्हिजिटसाठीं १५ रुपयांचं बिल लावेल, सरकारी वैद्यकीय विमा योजनेविरुद्ध संपावर जाईल आणि ब्रिटिश पद्धतीच्या मोफत औषधयोजनेला विरोध करेल.

**संभाव्य हुकूमशहा** फ्लोरेन्समधले माझे बहुतेक शाळासोबती वर्तमानपत्र कधींच वाचत नाहींत. आणि वाचतात ते प्रस्थापितांचं वर्तमानपत्रच तेवढं वाचतात. “या दैनिकाला भांडवल कोण पुरवतं माहीत आहे का?” असं मी त्यांच्यापैकीं एकाला

एकदां विचारलं. तर उत्तर मिळालं, "कुणीच नाहीं. तें स्वतंत्र आहे."

राजकारणाबद्दल कांहीं समजून घ्यावं असं त्यांना कधीं वाटतच नाहीं. त्यांच्यांतल्या एकाला तर कामगारसंघटना म्हणजे काय हेंदेखील माहीत नव्हतं.

संप म्हणजे उत्पादनाची नासाडी करण्याचं एक साधन एवढंच त्यांनीं ऐकलेलं आहे. हें कितपत खरं आहे याचा त्यांना कधींच प्रश्न पडत नाहीं.

त्यांच्यापैकीं तिघं सरळसरळ फॅसिस्ट आहेत. राजकारणा-बद्दल उदासीन असलेले अट्ठावीसजण अधिक हे तीन मिळून एकतीस फॅसिस्ट होतात.

**आणखीच आंधळे** याहून जरा वेगळ्या प्रकारचे कांहीं विद्यार्थी आणि बुद्धिजीवी आहेत. ते खूप वाचतात आणि ते डावे बंडखोर आहेत. तरीसुद्धां ते आणखीच आंधळे वाटतात.

शिक्षक-पालकांच्या सभेमधें अगदीं कट्टर डाव्या गटाच्या एका शिक्षकाचं भाषण मीं एकदां ऐकलं. भाषण 'दोपोस्कुओला' पर्यंत आलं आणि एकदम स्फोट झाल्यासारखा तो गरजला – 'मी दर आठवड्याला भरपूर अठरा तास शिकवतों हें तुमच्या लक्षांत येत नाहींसं दिसतं!'

५-३९ ची गाडी पकडण्यासाठीं पहांटें चाराला उठणारे कामगार आणि उन्हाळ्यांतसुद्धां दररोज अठराअठरा तास राबणाऱ्या शेतकऱ्यांनीं ती खोली भरलेली होती.

कुणीच बोललं नाहीं कीं हंसलं नाहीं. त्या शांततेमधें शंभर भावशून्य डोळे त्याच्यावर फक्त खिळून होते.

## ध्येय

**कडू फळ** तुमच्या अभ्यासक्रमाच्या निवडीच्या पद्धतीचं फळ हें कधींच न पिकणारं कडू फळ आहे. माझे बहुसंख्य शाळासोबती 'माजिस्त्राले'ला जात होते तें एकतर योगायोगानं किंवा पालकांनीं घातलं होतं म्हणून!

तुमच्या शाळेच्या दरवाज्यापाशीं मीं आलों तेव्हां एक नवी कोरी ब्रीफकेस माझ्या हातांत होती. माझ्या छोट्या विद्यार्थ्यांनीं दिलेली ती भेट होती. १५व्या वर्षींच मीं शिक्षक म्हणून माझा पहिला मोबदला मिळवला होता.

तुम्हांला किंवा माझ्या शाळासोबत्यांना मीं हें कधींच सांगितलं नाहीं. ती कदाचित् माझी चूकहि असेल. पण तुमची शाळा हें मोकळेपणानं बोलण्याचं ठिकाण नाहींच. आपल्याला काय हवं आहे हें माहीत असणाऱ्या आणि कांहींतरी अर्थपूर्ण करूं मागणाऱ्या विद्यार्थ्याला तिथं 'मूर्ख' समजलं जातं.

**चिक्कू** शिक्षक व्हायचं माझ्या शाळासोबत्यांपैकी कुणाच्याच डोक्यांत नव्हतं. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, "मला बँकेंत काम करायचं आहे. तांत्रिक शाळेंत ते गणितावर फार भर देतात. लिचिओमधें लॅटिनचा अतिरेक आहे. म्हणून मी इथं आलों."

या विद्यार्थ्यांच्या परिस्थितीबद्दल माहिती देणारी शेवटची खानेसुमारी १९६१ ची आहे. माजिस्त्रालेची पदविका असलेले नागरिक ६ लाख ७५ हजार ९७५ आहेत. निवृत्त झालेले शिक्षक ६०,०००. त्या वर्षी प्रत्यक्ष शिकवत असलेले २ लाख १ हजार. १ लाख २० हजार जणांनीं शिक्षकाच्या जागेसाठीं

अर्ज केलेला. म्हणजे शिकवूं शकतात पण प्रत्यक्षांत शिकवत नाहींत असे जवळजवळ ३ लाख नागरिक ठरतात - हेच ४३ टक्के होतात.

**असमाधानी** आपल्याला पुढं विद्यापीठांत जायला आवडेल असं अनेक शाळासोबत्यांनीं मला सांगितलं. पण आपल्याला कोणत्या विषयाचा खास अभ्यास करायचा आहे हें त्याचं त्यांनाच ठाऊक नव्हतं.

१९६३ मधें माजिस्त्रालेचे २२ हजार २६६ पदवीधर होते. पुढच्या वर्षी त्यांतले १३ हजार ३७० विद्यापीठांत अर्ज करतांना आपल्याला दिसतात.

म्हणजे शिकवण्याची पात्रता मिळवलेल्या दर शंभरांपैकीं ६० जण शिकवण्याचा विचार पण करत नाहींत.

**कोण स्वतःला शिक्षक म्हणूं शकतो?** माझ्या वर्गांतली एकटीच मुलगी इतरांपेक्षा जरा एक पायरी वरची वाटली.

ज्ञानाच्या प्रेमापोटीं ती शिकली. ती चांगली पुस्तकं वाचायची नि बाखचं संगीत ऐकण्यासाठीं स्वतःला खोलींत कोंडून घ्यायची.

तुमच्या शिक्षणपद्धतीला येतं तें अत्युत्तम फळ हें!

पण माझ्यावर संस्कार झाला आहे तो हा कीं हें फळ सर्वांत धोकेबाज नि मोहकारी आहे. ज्ञान हें दुसऱ्यांना देण्यासाठींच असतं. सांस्कृतिक आस्था निव्वळ स्वतःपुरती मर्यादित नसलेलाच तेवढा आपल्याला शिक्षक म्हणवूं शकतो!

**बंदिस्त शाळा** तुमच्या वर्गांत जसलीं मुलं आहेत त्यांना शिक्षक म्हणजे काय हें समजावून देणं तुम्हांला नाउमेद करणारं

आहे, हें मला ठाऊक आहे. पण - कुणीं कुणाला खच्ची केलं? मुलांनीं तुम्हांला का तुम्हीं  मुलांना?

शिक्षकाच्या पेशांत जाण्याऐवजीं माजिस्त्रालेनंतर विद्यापीठांत अर्ज करण्याची प्रवृत्ति वाढती आहे. त्यामुळं माजिस्त्रालेमधलं प्रशिक्षण जास्तीजास्ती सामान्य आणि ढोबळ होतं आहे.

चांगले शिक्षक निर्माण करण्यासाठीं आपल्याला स्वयंपूर्ण शाळेची गरज आहे. इतर क्षेत्रांत प्रवेश करण्याचा उंबरठा ठरणार नाहीं अशी शाळा. बँकेंत काम करायचं मनांत असलेल्या मुलाला अशा शाळेंत उपऱ्यासारखं वाटलं पाहिजे. शिक्षक व्हायचं ठरवलेल्या शेतावरून आलेल्या मुलाला तिथं घरच्यासारखं वाटावं.

**आवश्यक निवड** आतां आपण आठ वर्षं सक्तीच्या शाळेपेक्षां अगदीं वेगळ्या प्रश्नाशीं येऊन ठेवतों. तिथं प्रत्येकालाच समान दर्ज्याचा पवित्र अधिकार आहे. माजिस्त्रालेमधें मात्र फक्त लायकीचा प्रश्न येतो.

या शाळा नागरिकांना इतरांच्या सेवेचं खास शिक्षणं देतात. त्या विश्वासपात्र असायलाच हव्यात.

शिक्षणक्षेत्राची ही पदविका मिळवणं कठिणच असायला हवं. नंतर आम्हांला कमी लेखून चालणार नाहीं. केमिस्ट, डॉक्टर किंवा इंजीनिअर यांच्या बरोबरीनंच आम्हांला वागवलं जायला हवं.

**ध्येयावर नजर** गणित येत नाहीं म्हणून तुम्हीं एखाद्या टॅक्सीड्रायव्हरला नापास करत नाहीं. किंवा आपले कवी माहीत नाहींत म्हणून डॉक्टरला.

मला मात्र तुम्हीं एकदां अगदीं याच शब्दांत म्हणालां होतांत – "हें बघ, तुला लॅटिन पुरेसं येत नाहीं. तूं तांत्रिक शाळेंत का जात नाहींस?"

चांगल्या शिक्षकांच्या घडणीसाठी लॅटिन अगदीं आवश्यकच आहे अशी तुमची खात्री आहे का? तुम्हीं याचा कांहीं विचार केला आहे? तुम्हीं करतां तें एवढंच कीं आहे ती पठडी जशीच्या तशी चालूं ठेवतां. तुम्हीं तिचं खरोखरीं मूल्यमापन कधींच करत नाहीं.

**व्यक्ती** हा कुठून आला, कोण होता, ह्याला काय साधायचं आहे, हें स्वतःला विचारण्याइतपत तुम्हीं माझ्यामधें खराखुरा रस घेतला असता, तर तुमचं लॅटिन कधींच नजरे आड गेलं असतं.

पण मग आक्षेप घेण्यासारखं दुसरं कांहींतरी माझ्यामधें तुम्हांला मिळालं असतं. आपल्याला काय हवं आहे तें ठाऊक असलेला एक पंधरा वर्षांचा पोरगा समोर दिसणं तुम्हांला धास्तावून टाकतं. त्याच्या शिक्षकाचा प्रभाव तुम्हांला तिथं जाणवतो.

व्यक्तीचा असा खेळखंडोबा करणाऱ्याचा धिक्कार असो! पण व्यक्तित्वाचा मुक्त विकास हेंच तर तुमचं ब्रीदवाक्य आहे. समाजाच्या गरजांशीं तुमचा कांहीं संबंधच नाहीं.

माझ्यावर माझ्या शिक्षकांचा चांगलाच प्रभाव पडलेला आहे. आणि मला ह्याचा अभिमान वाटतो. त्यांनाहि ह्याचा अभिमान वाटतो. शाळेचा अर्थ हा नसेल तर आणखी आहे तरी कोणता?

माणूस आणि पशू यांच्यातला एक फरक म्हणजे शाळा. ज्याच्यावर शिक्षकाचा स्वतःचा विश्वास आहे, प्रेम आहे, जें व्हावं, घडावं अशी तो आशा करतो, तें सारं शिक्षक मुलाला

देतो. मोठा होत असतांना मुलगा त्यांत स्वतःची कांही भर घालेल. मानवजात पुढं जात राहते ती अशी.

जनावरं शाळेंत जात नाहींत. आपल्या व्यक्तित्वाचा स्वतंत्र मुक्त विकास साधतांना पक्षी आज हजारों वर्षं अगदीं तशींच घरटीं बांधत आले आहेत.

**मठ** अगदीं मठांतदेखील आपल्या जीवनकार्याचा शोध घेण्यासाठी तळमळत असलेलीं मुलं आहेत असं मला सांगण्यात आलं आहे. प्राथमिक शाळेंतच जर त्यांना सांगितलं असतं कीं 'आपल्या सर्वांचं जीवनकार्य सारखंच आहे – पण जिथं कुठं असूं तिथं कांहींतरी चांगलं करत राहणं – तर त्यांच्या आयुष्यांतलीं मोलाचीं वर्षं स्वतः बद्दल चिंता करत त्यांना गमवावीं लागलीं नसतीं.

**समाजसेवेची शाळा** दोन वेगळ्या प्रकारच्या शाळा ठेवून विषयाच्या शेवटच्या निवडीसाठीं आपल्याला जरा जास्ती वेळ देतां येईल.

चौदा ते अठरा वर्षं वयाच्या मुलांसाठी एक शाळा. हिला 'सामाजिक सेवा शाळा' म्हणता येईल. आपलं आयुष्य दुसऱ्यांसाठीं द्यायचं आधींच ठरवलेल्या अशा कुणाहिसाठीं ही शाळा धर्मोपदेशक, प्राथमिक शाळाशिक्षक, कामगार संघटना कार्यकर्ते आणि राजकीय कार्यकर्ते या सर्वांसाठीं. आपापल्या विषयांतल्या विशेष व्यासंगासाठीं जास्तीचं एक वर्ष ठेवतां येईल.

बाकी सगळ्या शाळांना आपण 'अहंसेवा शाळा' असं नांव देऊं या. आणि आतां सध्यां आहेत त्याच शाळा तशाच, न बदलतां त्यासाठीं चालूं ठेवतां येतील.

**उच्च ध्येयं** या सामाजिक सेवा शाळेनं जास्तीजास्ती वरची पायरी गांठायचा प्रयत्न करावा आणि त्यांत आनंद मिळवावा. मार्क नाहींत, प्रगतिपुस्तक नाहीं, खेळ नाहीं, सुट्टया नाहींत. लग्न किंवा व्यवसाय याबद्दलचा दुबळेपणा नाहीं. सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण समर्पणाची दिशा इथं दाखवली जाईल.

कांहींजण ह्या वाटेवर जरा खालीं थांबतील कदाचित्. त्यांना मुली भेटतील आणि जरा मर्यादित कुटुंबावर प्रेम करायला ते स्थिरावतील.

पण आयुष्यांतलीं सर्वांत चांगलीं वर्षं विशाल कुटुंबाच्या - मानवकुटुंबाच्या – सेवेच्या तयारीसाठीं घालवल्यामुळं ते कितीतरी चांगले निघतील. समोर आदर्श बाळगून आपल्या मुलाला वाढवायला तत्पर. त्याला त्याच शाळेकडे पाठवणारे. ते जास्ती चांगले आईबाप होतील.

तुमची अहंसेवा शाळा प्रत्येकाला लग्नासाठींच तयार करायला बघते. लग्न करणाऱ्यांच्या बाबतींतसुद्धां तिला फारसं यश मिळत नाहीं आणि त्यांच्यातला एकदा जर का अविवाहित राहिला तर तो अगदीं कडवट ब्रह्मचारी होतो.

**बेकार शिक्षक** शिक्षकाची संख्या वाजवीपेक्षां मोठी आहे अशा तक्रारी आम्हीं नेहमीं ऐकतों. तें खरं नाहीं. अध्यापन हा व्यवसायच सध्यां असां आहे कीं मनापासून मुळींच आवडत नसलेल्या कैकजणांना तो आकर्षित करतो. कामांचे तास वाढवा - बघा, ते सगळे सोडून जातील.

लग्न झालेली शिक्षिका नवऱ्याइतकेच पैसे मिळवते. प्रत्यक्षांत कांहीं ती एखाद्या गृहिणीपेक्षां जास्ती वेळ घराबाहेर नसते. अगदी आदर्श पत्नी आणि माता. मुलाला सर्दी झाली कीं

दरवेळीं ती घरीं राहते. अशी बाई बायको म्हणून कुणाला नको असेल?

खेरीज माध्यमिक शाळेंत न भरलेल्या हजारों जागा आहेत. कुठलीहि उच्च पदवी असलेल्या किंवा पदवीसाठीं शिकत असलेल्या (केमिस्ट, गुरांचा डॉक्टर, उनाडटप्पू विद्यार्थी) अशा कुणालाहि तुम्हीं तिथं भरतां.

पण वर्गांत शिकवण्याचा वर्षांनुवर्ष अनुभव असलेल्या प्राथमिक शिक्षकांना कांहीं तुम्हीं या जागा देऊं करत नाहीं.

**जाती** आत्तांचे सत्ताधारी हे माजिस्त्रालेच्या पदवीधरांना माध्यमिक शाळेचीं दारं कधींच खुलीं करणार नाहींत.

उलट कांहींजण तर प्राथमिक शाळेंत शिकवायलादेखील विद्यापीठाची पदवी आवश्यक करावी असं सुचवताहेत. अध्यापनशास्त्र आणि मानसशास्त्र हे विषय विद्यापीठाच्या पातळीवरच अभ्यासायला हवेत असं त्यांचं म्हणणं.

विद्यापीठाचे पदवीधर शाळेवर टीका करतात आणि तिला रोगट म्हणतात तेव्हां आपल्याला तिनंच घडवलेलं आहे हें ते विसरतात. पंचविसाव्या वर्षापर्यंत याच विषावर ते वाढले. वेगळी परिस्थिती असलेल्या माणसांतसुद्धां कांही गुण असतील याची कल्पना पण त्यांना करतां येत नाहीं.

आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षकांबरोबरचं त्याचं बोलणं आपल्या कुटुंबांतल्या माणसांबरोबर बोलावं तसं असतं. ते कांहीं लपवून ठेवत नाहींत. ते सहकार्यानं काम करतात.

पण माध्यमिक शाळेंतल्या शिक्षकांबरोबर बोलतांना मात्र जणूं कांहीं आपण शत्रूला तोंड देत आहोंत अशा रीतीनं आपले शब्द ते अगदीं तोलूनमापून वापरतात.

ते कबूल नाहीं करणार, पण खरं काय तें त्यांना माहीत आहे. प्राथमिक शिक्षक चांगले असतात, कारण त्यांनीं शिक्षणासाठीं फार वेळ घालवलेला नसतो. वरच्या शाळांतले शिक्षक आहेत हे असे आहेत, कारण त्या सगळ्यांना तशाच पदव्या आहेत.

## संस्कृति – सर्वांचीच गरज

**स्थलांतर** डोंगराळ भागांत आम्हांला जगणं शक्य नाहीं. आणि सपाटीवर आमची संख्या नको एवढी जास्त आहे. या मुद्दयावर सर्व अर्थशास्त्रज्ञांचं एकमत आहे.

आणि त्यांना नाहीं पटलं तरी काय? माझ्या आईबाबांच्या जागीं स्वतःला उभं करून पहा. तुमच्या मुलाला बाजूला सारलेलं तुम्हांला सहन होईल का? तर मग आम्हांला तुम्हीं तुमच्यामधें आनंदानं घ्यायला हवं – आणि तेंसुद्धां अकुशल कामालाच तेवढे योग्य असे दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून नव्हे.

प्रत्येक समाजाला स्वतःची अशी संस्कृति असते. आणि दुसऱ्यांपेक्षा ती मुळींच उणी नसते. आमची संस्कृति आम्हीं तुमच्यासाठीं भेट म्हणून आणतों. पुस्तकं वाचण्यापलीकडे कांहींहि केलेलं नाहीं अशा माणसांनीं लिहिलेल्या तुमच्या पुस्तकांचा कोरडेपणा कमी करायला तेवढीच जिवंत वाऱ्याची झुळुक!

**शेती संस्कृति** शाळेंत लावलेल्या पुस्तकाचीं पानं चाळतांना आम्हांला वनस्पती, प्राणी आणि निरनिराळे ऋतू दिसतात. हें फक्त शेतकऱ्यानंच लिहिलेलं असणं शक्य आहे असं वाटतं.

पण नाहीं. याचे लेखक ही तुमच्याच शाळेची निपज आहे. त्यांतल्या चित्रांकडे फक्त नजर टाकली तरी पुरे. डावखुरे

शेतकरी, गोल फावडीं, वांकड्या कुदळी, रोमन काळांतलीं अवजारं असलेले लोहार आणि प्लमचीं पानं असलेलीं चेरीचीं झाडं.

माझ्या पहिल्या यत्तेची शिक्षिका एक दिवस मला म्हणाली, – "त्या झाडावर चढ आणि माझ्यासाठीं कांहीं चेरी वेंच." माझ्या आईनं हें ऐकलं तेव्हां ती म्हणाली, 'कुणा मूर्खानं तिला मास्तरीण केलं तरी?'

तिला तुम्हीं शिकवायचा परवाना दिला. पण मला मात्र तुम्हीं तो नाकारतां – मला माझीं सर्व झाडं, अगदीं झाड न् झाडं ठाऊक आहे तरी.

मला माझी 'सॉर्मेती' (द्राक्षाच्या वाळक्या फांद्या) देखील माहित आहे. मीं त्या फांद्या छाटल्या आहेत, गोळा केल्या आहेत, आणि भाकरी भाजायला त्या वापरल्या आहेत. माझ्या एका पेपरांत तुम्हीं 'सॉर्मेती' हा शब्द चुकीचा म्हणून त्याच्याखालीं रेघ ओढलीत. हा शब्द 'सारमेंती' असा आहे, कारण तो लॅटिनपासून आला आहे असा तुम्हीं आग्रह धरला. नंतर शब्दकोशांत त्याचा अर्थ बघण्यासाठीं तुम्हीं नजर चुकवून निघून गेलांत.

**अगदी एकटे, कुत्र्यांसारखे** माणसांबद्दल तुम्हांला आमच्यापेक्षां कितीतरी कमी माहिती आहे. तुमच्या इमारतींतल्या माणसांकडे दुर्लक्ष करायला लिफ्ट हें उत्तम यांत्रिक साधन आहे. बसमधून प्रवास करणाऱ्या माणसांकडे कानाडोळा करायला गाडी आणि माणसांचे चेहरे पाहणं, त्यांच्या घरीं जाणं टाळण्यासाठीं टेलिफोन.

तुमच्याबद्दल मला ठाऊक नाहीं, पण सिसेरोची (लॅटिन लेखक) माहिती असणारे तुमचे विद्यार्थी जित्याजागत्या किती

माणसांना जवळून ओळखतात? त्यांच्यापैकी कितीजणांच्या स्वैपाकघरांत ते गेले आहेत? त्यांच्यापैकीं किती आजाऱ्यांच्या शेजारीं बसून त्यांनीं रात्र जागवली आहे? त्यांच्यापैकीं मेलेल्या कितीजणांना त्यांनी खांदा दिला आहे? आणि स्वतःवर एखादं संकट कोसळलं तर त्यांतल्या कितीजणांचा भरोसा त्यांना वाटतो?

१९६६ चा तो मोठा पूर फ्लोरेन्समधें आला नसता तर तळमजल्यावर राहणाऱ्या कुटुंबांत किती माणसं आहेत हेंसुद्धां त्यांना सांगतां आलं नसतं.

एक वर्षभर मी या तरुणांबरोबर एका वर्गांत होतों. पण त्यांचीं घरं-माणसं कशीं आहेत, मला कांहीं कल्पना नाहीं. आणि तरी त्यांची वटवट कधीं थांबतच नाहीं. कितीदांतरी ते इतक्या उंच आवाजांत बोलतात कीं ते काय म्हणताहेत हें कुणालाच कळू नये. बाकी त्यांना प्रत्येकाला फक्त स्वतःचंच तेवढं ऐकायचं असतं.

**मानवी संस्कृति** तुमच्या खिडक्यांखालून दररोज हजार मोटार-गाड्या आवाज करत जातात. त्या कुणाच्या आहेत, कुठं जाताहेत, तुम्हांला जराहि कल्पना नसते.

पण माझ्या दरीमधले मैलोगणती परिसरांतले आवाज मला ओळखतां येतात. हा दूरवरचा मोटरचा आवाज म्हणजे जरा उशीर झालेला, स्टेशनवर जात असलेला नेव्हिओ. हवं तर शेंकडों लोकांबद्दल, डझनावारी कुटुंबांबद्दल, त्यांच्या नातलगांबद्दल आणि मित्रमंडळींबद्दल सारं कांहीं मला तुम्हांला सांगतां येईल.

जेव्हां जेव्हां तुम्हीं एखाद्या कामगाराशीं बोलतां, तेव्हां तुमचा सूर चुकीचाच लागतो. तुमची शब्दांची निवड, तुमचा

स्वर, तुमचे विनोद - सारंच कांहीं चुकीचं. पण एखादा गिर्यारोहक गप्प असतो तेव्हांदेखील तो काय विचार करतो आहे हें मी सांगूं शकतों. आणि तो दुसऱ्या कशाबद्दल तरी बोलत असतो तेव्हासुद्धां त्याच्या मनाला काय चिंता लागून राहिली आहे हें मला कळतं.

तुमच्या कवींनीं तुम्हांला द्यायला हवी होती ती या प्रकारची संस्कृति. ही ९/१० जगाची संस्कृति आहे. पण अद्याप कुणींच ती शब्दांत किंवा चित्रांत किंवा चित्रपटांतून टिपलेली नाहीं.

निदान जरा नम्र तरी व्हा. आमच्या संस्कृतीइतकीच रुंद खिंडारं तुमच्याहि संस्कृतींत आहेत. कदाचित् आणखीन् मोठींच. ह्या कशाचीच जाणीव नसणं प्राथमिक शाळेमधल्या शिक्षकाला तर निश्चितच जास्ती हानिकारक आहे.

## तुम्हीं आमच्यावर लादतां ती संस्कृति

**लॅटिन** आम्हांला कधींच शिकवावा लागणार नाहीं असा तुमचा सर्वांत महत्त्वाचा विषय.

तुम्हीं आम्हांला इटालियनवरून लॅटिन भाषांतरदेखील करायला लावतां. पण लॅटिन संपतं कुठं नि इटालियन सुरूं होतं कुठं, यांतली सीमारेषा कोण काढणार?

कुणींतरी तुमच्यासाठीं लॅटिनचं व्याकरणदेखील लिहिलं आहे. ही भलीमोठी फसवणूक आहे. कारण प्रत्येकच नियमाचा उगम खरोखरीं कुठं न् केव्हां होतो हें माहीत असायला हवं.

मुलं असलीं ही व्याकरणाची शिक्षा स्वीकारतात आणि सर्व नियम अगदीं तोंडपाठ करतात. त्यांना काळजी असते काय ती फक्त पास होण्याची. ते स्वतः शिक्षक झाल्यावर ह्याच नियमावर बोट ठेवायचा खेळ ते पण खेळतील.

माझ्या एका पेपरांत तुम्हीं Portavit ह्या शब्दाखालीं रेघ मारलीत. Porta म्हणजे उचलणं, वाहणं. सोपं क्रियापद. त्याच अर्थी दुसरं कठिण Fero. पण गुंतागुंतीची करतां येईल अशी कोणतीहि गोष्ट सोपी करायला बघणं हा तुमच्या मतें गुन्हा आहे. एक चमत्कारिक गोष्ट अशी कीं सिसेरोनं मात्र अनेकदां 'पोर्तो'चा वापर केला आहे. 'तो रोमन होता आणि त्याला स्वतःला तें ठाऊकहि नव्हतं.' (पास्कारेलाच्या The Discovery of America कवितेमधली एक ओळ.)

**गणित** माजिस्त्रालेमधें वाईट तऱ्हेनं शिकवला जाणारा दुसरा विषय म्हणजें गणित. प्राथमिक पातळीवर शिकवण्यासाठीं प्राथमिक गणित येणं पुरेसं आहे. माध्यमिकच्या तीन यत्तांमधलं गणित केवळ जास्तीचं म्हणून आहे. खरं तर माजिस्त्रालेच्या अभ्यासक्रमांतून सारं गणित काढून टाकतां येईल. त्याऐवजीं गणित शिकवण्याची सोपी, चांगली पद्धत कोणती तें शोधून काढावं. ती पद्धत म्हणजे गणित नव्हे. पण शिकण्याच्या पद्धतीशीं किंवा शिकवण्याच्या शास्त्राशीं ती संबंधित असेल.

एखाद्या तज्ज्ञाच्या दोन-तीन तासांतून आपल्या सामान्य संस्कृतीचा एक भाग म्हणून थोडंसं उच्च गणित शिकवतां येईल. तें कशाबद्दल आहे हें त्यानं थोडक्यांत उलगडून सांगावं.

माजिस्त्रालेमधून पदवी घेणारे शिक्षक जरी भावी काळांत माध्यमिक यत्तांना शिकवायला लागले तरी परिस्थिति कांहीं त्यामुळं मुळांत बदलणार नाहीं.

खरं म्हणजे माध्यमिक पातळीवर शिकवण्यासाठीं गणिताच्या पदवीची मुळींच जरूरी नाहीं. विद्यापीठाची पदवी घेतलेलीं मुलं असलेल्या खास वर्गानंच हें सुरूं केलं. त्यामुळं कुणालाहि

हव्याहव्याशा वाटणाऱ्या २० हजार ४७८ नोकऱ्या त्यांना सहजपणं आपल्या खिशांत टाकतां आल्या. काम अगदीं कमी - आठवड्याला फक्त सोळा तास. पुन्हां त्यांतहि डोक्याला ताण नाहीं. त्याचत्याच खुळचट गोष्टी अशा नोकरींत वर्षानुवर्ष पुन्हांपुन्हां शिकवत राहतां येतात. ह्या गोष्टी पण अशा कीं माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंतल्या कुठल्याहि विद्यार्थ्याला त्या आधींच ठाऊक असतात. ह्या नोकरींत सगळ्या विद्यार्थ्यांचे पेपर तपासायला फार तर पंधरा मिनिटं लागतात. कारण उत्तरं एकतर 'बरोबर ' किंवा 'चूक' एवढींच लिहायचीं असतात.

**तत्त्वज्ञान** एखाद्या बारक्याशा गाइडवरून कुठल्याहि विचारवंतांचा अभ्यास करणं भलतंच कंटाळवाणं असतं. इतके विचारवंत आणि ते इतक्या कांहीं गोष्टी सांगत असतात.

माझ्या तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांनीं कुणाच्याहि बाजूनं किंवा विरुद्ध असं मत केव्हांच मांडलं नाहीं. त्यांना हे सगळेच आवडाताहेत कीं ते सगळ्यांच्याचबद्दल बेफिकीर होते हें कांहीं मला समजलं नाहीं.

दोन शिक्षकांमधून मला एकाची निवड करायची असेल - एक त्या विषयाचं वेड असलेला आणि दुसरा त्याबद्दल पूर्णपणं उदासीन - तर मी पहिलाच पत्करेन. त्याला स्वतःचं असं मत असेल किंवा एखादा विशिष्ट विचारवंतच त्याला मान्य असेल. तो नक्की असं त्याच विचारवंताबद्दल फक्त बोलेल आणि बाकी साऱ्यांवर हल्ला चढवेल. पण शाळेंतल्या आमच्यी तीन वर्षांत ह्या विचारवंताचं मूळ लिखाण तो आम्हांला वाचायला लावेल. तत्त्वज्ञान आपलं सबंध आयुष्य व्यापून टाकूं शकतं हें आम्हांला या अवधींत पटेल.

**अध्यापनशास्त्र** मला अगदीं ठामपणानं नाहीं सांगतां येणार, पण अध्यापनशास्त्र आज अशातऱ्हेनं शिकवलं जातं कीं मी तें पुरतंच गाळून टाकीन. कदाचित् आपण त्या विषयांत खोलवर गेलों तर त्यांत सांगण्यासारखं कांहीं आहे कीं नाहीं हें आपल्याला ठरवतां येईल.

आपल्याला कदाचित् दिसून येईल कीं अध्यापनशास्त्र फक्त एकच गोष्ट सांगत आहे - प्रत्येक मुलगा निराळा आहे, प्रत्येक ऐतिहासिक क्षण वेगळा आहे. म्हणून प्रत्येक मुलगा, प्रत्येक देश, प्रत्येक परिस्थिति आणि प्रत्येक कुटुंबासाठीं प्रत्येक क्षण वेगवेगळा आहे.

हें स्पष्ट करण्यासाठी लावलेल्या पुस्तकांतलं फक्त अर्धं पान पुरेसं आहे. बाकीचीं पानं फाडून फेंकून द्यायला हरकत नाहीं.

शिकवण्याबद्दलचा कोणता-ना-कोणता प्रश्न उद्भवला नाहीं असा बार्बियानाच्या शाळेंत एकहि दिवस गेला नाहीं. पण आम्हीं त्याला कधीं अध्यापनशास्त्र म्हणून ओळखलं नाहीं. आमच्यासाठीं त्या प्रश्नाला नेहमींच त्या-त्या मुलाचं नांव होतं. प्रत्येकच वेळीं - पुन्हां पुन्हां.

गियानीबद्दल आम्हांला आधींच ठाऊक नाहीं असं कांहीं सांगणारा प्रबंध कुणाहि प्राध्यापकानं लिहिला असेल असं मला वाटत नाहीं.

**बायबल** तीन वर्षं महाकाव्यांच्या (इलियड, ओडेसी, इनिड) वाईट भाषांतरांचा अभ्यास करण्यांत घालवलीं. तीन वर्षं डांटे वाचण्यांत आणि बायबलसाठीं एक मिनिटसुद्धां नाहीं.

बायवल हा केवळ धर्मोपदेशकांचाच प्रांत आहे असा दावा करूं नका. धार्मिक मुद्दा बाजूला ठेवला तरी प्रत्येक शाळेंत प्रत्येक वर्षी वाचला जावा असा हा ग्रंथ आहे.

ज्या ग्रंथानं सर्व देशांच्या सरहद्दी ओलांडून साऱ्या जगभर आपला खोल ठसा उमटवला आहे, त्याच्या अभ्यासाला वाङ्मयाच्या अभ्यासक्रमांत सर्वांत जास्त वेळ मिळायला हवा.

भूगोलाच्या वर्गांत मोठं प्रकरण पॅलेस्टाईनचं असायला हवं. इतिहासांत येशूच्या प्रत्यक्ष आयुष्यांत - त्याच्या जन्माआधीं आणि नंतर - घडलेले प्रसंग असायला हवेत.

जुन्या कराराचं वाचन, कराराच्या चारी प्रतींच्या एकत्रित पुस्तकाचा अभ्यास, कराराच्या जुन्या हस्तलिखितांतल्या फरकांचा अभ्यास, आणि भाषाशास्त्र, पुराशास्त्रविषयक संबंधित प्रश्न - ह्या सगळ्या गोष्टींनीं मिळून ह्या विषयाचा अभ्यासक्रम बनायला हवा. हें तुमच्या डोक्यांतच कसं आलं नाहीं? असं असेल का कीं तुमच्या शाळांची आंखणी करणाऱ्या मंडळींचा येशूवर अजिबातच विश्वास नव्हता? कारण येशू हा गरिबांचा एवढा जिवाभावाचा सखा आणि मालदारांना पारखा!

**धर्म** शिक्षणांत बायबलला योग्य जागा मिळाली कीं धर्मशिक्षणाला महत्त्व येईल.

मूळ लिखाणाचा अर्थ लावायला मुलांना मार्गदर्शन करणं एवढाच काय तो प्रश्न. एखाद्या धर्मोपदेशकालासुद्धां हें करतां येईल. विशेषतः धर्मोपदेशकाइतकंच बायबलचं चांगलं ज्ञान असलेल्या एखाद्या नास्तिक पण विचारी शिक्षकाच्या जोडीनं.

अशा शिक्षकांना तुम्हीं धुंडाळायला लागलांत कीं तुमच्या संस्कृतीच्या मर्यादा तुम्हाला अगदीं ठळकपणं दिसायला लागतील.

वरच्या पातळीवर बायबल शिकवूं शकतील असे डझनावारी धर्मोपदेशक फ्लोरेन्समधें आहेत. त्यांना ग्रीक अगदीं सहजच वाचतां येतं आणि गरज पडलीच तर पुरेसं हिब्रू पण समजतं.

वादविवादांत यांना तोडीस तोड तोंड देऊ शकेल असा आणि धर्मोपदेशक नसलेला एखादा माणूस तुम्हांला सुचवतां येईल का? तुमच्या शाळांतून तयार झालेला – चर्चच्या पठडींतला नाहीं.

बायबल सोडून जगांतलीं यच्चयावत् पुस्तकं वाचलेल्या एका तरुण विचारवंताच्या भाषणांत मीं ऐकलं – 'गीद म्हणतो, गव्हाचा दाणा जमिनीवर पडलाच नाहीं तर जिवंत असून त्यांतून नवीन दाणे धरणार नाहींत.'

आतां हें श्रीयुत गीद कोण हें कांहीं मला ठाऊक नव्हतं. कोशांत आम्हांला ते मिळाले. फ्रेंच लेखक. बहुधा त्यांनीं या धर्मग्रंथांतलं वाक्य आपल्या पुस्तकांत वापरलं आणि या प्राध्यापकाला तें लेखकाचंच वाटलं. पण बायबल हा अनेक वर्ष माझ्या अभ्यासाचा विषय आहे. आणि आयुष्यभर मी त्याचा अभ्यास करतच राहीन.

**सरदार** बायबल विसरलेलीं माणसं कांहींहि करायला धजतील, तुम्हीं शिकवतां त्या प्रत्येकच गोष्टीबद्दल संशय घेतां येईल. या निवडी केल्या तरी कुणीं याचंच नवल वाटायला लागतं.

तुमच्या शाळेच्या जन्मापासूनच तिच्या अडचणींना सुरवात झाली हेंच खरं.

तिचा जन्म झाला १८५९ मधें. दुसरा वित्तोर एमान्युएल तेव्हां राजा होता. आपल्या कुटुंबाची मालमत्ता त्याला वाढवायची होती. म्हणून त्यानं युद्धाच्या तयारीला सुरवात केली. पहिली

गोष्ट म्हणजे एका सेनापतीला त्यानं कारभारी म्हणून बसवलं. नंतर लोकसभेला सुट्टी दिली. शेवटीं त्यानं एका सरदाराला बोलावलं आणि त्याला देशांतल्या शिक्षणावर कायदा लिहायला लावला.

शस्त्राच्या बळावर संपूर्ण इटालीमधें लादलेला हा कायदा अजूनी आपल्या शालेय शिक्षणाचा आधारस्तंभ आहे.

**इतिहास** या कायद्यानं सगळ्यांत नुकसान केलं तें इतिहास या विषयाचं!

पण साधारणपणानं तीं पुस्तकं म्हणजे इतिहास नव्हेच. जेत्यांनीं शेतकऱ्यांपर्यंत ढकलेल्या त्या संकुचित एकतर्फी फालतू गोष्टी आहेत. इटाली जगाच्या अगदीं केंद्रस्थानीं. पराजित नेहमींच वाईट, जेते सर्व चांगले. राजे, सेनापती आणि देशां-देशांमधलीं अडाणी युद्धं यांच्याबद्दलच्याच गोष्टी. कामगारांचीं दुःखं आणि लढे यांच्याकडे एकतर दुर्लक्ष तरी केलेलं. नाहींतर त्यांना वळचणीला खुपसून ठेवलेलं.

सेनापति नि शस्त्रांच्या कारखानदारांना न आवडणाऱ्या माणसाचे दिवस भरलेच म्हणून समजा. सर्वांत चांगल्या 'अत्याधुनिक' पुस्तकांतसुद्धां गांधींना केवळ नऊच ओळींत आटपलं आहे. त्यांचे विचार आणि त्याहिपेक्षां त्यांचा कार्यक्रम यावर चकार शब्दहि नाहीं.

**नागरिकशास्त्र** मला कांहीं माहिती आहे असा दुसरा विषय म्हणजे नागरिकशास्त्र. पण तुमच्या शाळांतून तो येतच नाहीं.

सबब सांगावी तसं कांहीं शिक्षक म्हणतात कीं दुसऱ्या विषयांतून नकळत हा विषय शिकवला जातो. हें खरं असतं

तर त्यावर विश्वास ठेवणंच अवघड इतकं तें चांगलं होतं! कुठलाहि विषय शिकवायला हा जर खरोखर इतका थोर मार्ग आहे तर सगळ्याच विषयांसाठीं हाच मार्ग ते कां धरत नाहींत? ज्यांत सगळे घटक एकत्र मिसळलेले आहेत आणि तरीहि कोणत्याहि वेळीं स्वतंत्रपणं ते वेगळे काढतां येतील अशी एक भक्कम बांधलेली इमारत!

खरं तर आपल्याला नागरिकशास्त्र फारसं कळत नाहीं हें कबूल करा. महापौर म्हणजें नेमकं काय याची अगदीं अंधुकशीच तेवढी कल्पना तुम्हांला आहे. एखाद्या कामगाराच्या घरीं तुम्हीं कधींच जेवलेला पण नाहींत. सार्वजनिक वाहतुकीच्या भिजत पडलेल्या प्रश्नाच्या सगळ्या बाजू तुम्हांला ठाऊक नाहींत. तुम्हांला ठाऊक आहे तें एवढंच कीं ही वाहतुकीची कोंडी तुमचं खाजगी आयुष्य बिघडवून टाकते आहे.

तुम्हीं या प्रश्नांचा अभ्यास कधीं केलेलाच नाहीं. कारण ते प्रश्न तुम्हाला घाबरवून टाकतात. जशी भूगोलाच्या अर्थाच्या तळाशीं जायची तुम्हांला भीति वाटते. तुमच्या पुस्तकांत साऱ्या जगाचा समावेश आहे, मात्र भूक, मक्तेदारी, राजकीय पद्धति आणि वंशवाद यांचा साधा उल्लेख पण नाहीं.

**शेरे** तुमच्या अभ्यासक्रमांत एक विषय पुरता गाळलेलाच आहे – लिहिण्याची कला.

तुमच्या विद्यार्थ्यांच्या निबंधावरतीं तुम्हीं जे शेरे मारतां, त्यांतले फक्त कांहीं पाहिले तरी पुरे. त्यांचा शेलका संग्रह माझ्यापाशीं आहे - इथंच. हे शेरे म्हणजे एकदम ठाम विधानं. लेखन सुधारण्यासाठीं उपयोगी असं कधींच कांहीं नाहीं.

'पोरकट. उथळ. अप्रगल्भता दिसते. अगदीं सामान्य. फालतू'. - या प्रकारच्या शेऱ्यांचा मुलाला काय उपयोग होणार? त्यानं आपल्या आजोबांना शाळेला पाठवावं, ते जास्ती प्रौढ आहेत.

दुसरे कांहीं शेरे : 'क्षुद्र मुद्दे. अपुरी समज. फिक्या कल्पना. लिहिलेल्यांत जीव नाहीं.' तर मग विषयच चुकीचा असला पाहिजे. तो द्यायलाच नको होता.

किंवा 'रचना सुधारण्याचा प्रयत्न कर. चुकीची रचना. संकुचित. अस्पष्ट. बांधणी नीट नाहीं. ढिसाळपणा. जास्ती सोपेपणानं लिहिण्याचा प्रयत्न कर. वाक्याची मांडणी सगळी चूक. स्वतःचं म्हणणं व्यक्त करायची पद्धत सहज नाहीं. अभिव्यक्तीच्या माध्यमावर अधिक चांगला ताबा हवा.' – हें सारं तर तुम्हीं च शिकवायला हवं होतं. पण लिहायला शिकवतां येतं यावरच तुमचा विश्वास नाहीं. लिहिण्याच्या कलेचे कांहीं वस्तुनिष्ठ नियम आहेत हें तुम्हांला पटतच नाहीं. एकोणिसाव्या शतकांल्या व्यक्तित्ववादांत अजुनी तुमचं लोणचं घालून ठेवलेलं आहे.

नंतर दैवी हस्तस्पर्श झालेला प्राणीहि आपल्याला भेटतो. 'उत्स्फूर्त. कल्पनावैभव. उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशीं सुसंगत असा कल्पनांचा योग्य उपयोग.' – इतकं पुढं गेल्यावर 'जिनं तुला जन्म दिला ती माता धन्य आहे' अशी भर घालायला काय हरकत आहे?

**प्रतिभाशाली** 'लेखक जन्मावे लागतात. निर्माण करतां येत नाहीत' असा शेरा ठोकून आणि अगदीं खालची श्रेणी देऊन माझा एक निबंध तुम्हीं परत केलांत. दरम्यान इटालियनचे शिक्षक म्हणून तुम्हांला पगार मात्र मिळतच होता.

प्रतिभेचा सिद्धांत हा मध्यमवर्गीय शोध आहे. वंशवाद आणि आळशीपणा यांच्या मिश्रणामधून तो जन्माला आला.

राजकारणांत पण तो उपयोगीं पडतो. चिकार पक्षांच्या गुंतावळ्यांतून वाट काढण्यापेक्षां एखाद्या द गॉलचा आधार घेणं, त्याला प्रतिभाशाली म्हणणं आणि द गॉल म्हणजेच फ्रान्स असं म्हणणं हें सारं तुम्हांला सोपं वाटतं.

इटालियनचा वर्ग तुम्हीं याच पद्धतीनं चालवतां. पिएरिनोला ती देणगी आहे. मला नाहीं. तेव्हां आतां त्याबद्दल आपण निवांतच राहूं या.

आपण काय लिहितों याचा पिएरिनो विचार करतो  कीं नाहीं याला महत्त्वच नाहीं. त्याच्याभोंवतीं आधींच असलेल्या पुस्तकांसारखींच आणखी पुस्तकं तो लिहील. त्यांतल्या एकाहि कल्पनेला धक्का न लावतां त्या पाचशेंचीं पन्नास पानं आपल्याला सहज करून घेतां येतील.

शरणागती शिकून मला माघारी जंगलांत जातां येईल.

तुम्हीं  - समोरच्या प्रगतिपुस्तकांत लहानलहान खुणा करत टेबलामागं वेळ काढत तुम्हांला बसून राहतां येईल!

**कलासंप्रदाय**     दुसऱ्या कोणत्याहि कौशल्याप्रमाणंच लेखनकला पण शिकवली जायला हवी.

पण इथं बार्बियानामधें या प्रश्नावर आमच्यामधेंच चर्चा झाली. एका गटाला या लेखनाबद्दल आपण कोणती पद्धत वापरतों त्याचं वर्णन हवं होतं. दुसरे म्हणाले, ‘कला हा गंभीर विषय आहे - त्यांतलीं तंत्र असतील सोपीं. पण वाचक आपल्याला हंसतील.’

गरीब आपल्याला हंसणार नाहींत. श्रीमंतांना हंसायचं तितकं हंसूं द्या. आणि पुस्तक किंवा वर्तमानपत्र लिहिण्याचं गरिबांच्यासारख कसब त्यांच्याजवळ नाहीं, म्हणून आपण त्यांना हंसूं या.

अखेर ज्या वाचकांना आपल्याबद्दल जिव्हाळा असेल, त्यांच्यासाठीं सारं कांहीं लिहून काढायचं आम्हीं ठरवलं.

**साधंसुधं कौशल्य** आम्हीं करतों तें असं : सुरवातीला – आमच्यापैकीं प्रत्येकजण आपल्या खिशांत एक टिपणवही बाळगतो. प्रत्येक वेळीं एखादी कल्पना सुचली कीं प्रत्येकजण तिची नोंद करतो. प्रत्येक कल्पना वेगळ्या पानावर, एका बाजूला.

नंतर एक दिवस आम्हीं सगळे कागद एकत्र गोळा करतों आणि एका मोठ्या टेबलावर पसरतों. एकामागून एक आम्हीं ते बघत जातों. त्याच-त्याच कल्पना वगळण्यासाठीं. त्यानंतर एकमेकांशीं संबंधित कागदांचे आम्हीं स्वतंत्र ढीग करतो. यांतून प्रकरणं तयार करायचीं. प्रत्येक प्रकरण छोट्याछोट्या गट्ठयांत विभागलं जातं. त्यांचे परिच्छेद बनवायचे.

इथं प्रत्येक परिच्छेदाला मथळा देण्याचा प्रयत्न आम्हीं करतों. हें जमलं नाहीं तर त्याचा अर्थ एकतर परिच्छेदांत कांहीं मुद्दा नाहीं. किंवा अनेक मुद्दे एकत्र कोंबलेले आहेत. मग कांहीं परिच्छेद नाहीसे होतात. कांहीं तोडले जातात.

परिच्छेदांना नांव देतांनाच त्यांच्या तर्कशुद्ध अनुक्रमाचा आम्हीं विचार करतों - एक आराखडा तयार होईपर्यंत. आराखडा पक्का झाला कीं त्याला अनुसरून साऱ्या गट्ठयांची परत मांडणी करतों.

पहिला गट्ठा घेऊन आम्हीं टेबलावर कागद पसरतों आणि त्यांचा अनुक्रम शोधतों. लिखाणाचा पहिला आराखडा मांडायला ही सुरवात झाली.

मग त्याच्या नकला काढतों. म्हणजे आमच्या प्रत्येकाच्या पुढ्यांत त्याची एकेक प्रत मिळते. मग कात्री, गोंद आणि रंगीत पेन्सिली. आम्हीं तें सारं पुन्हां फिरवतों. नवीन कागद जोडले जातात. पुन्हां त्याच्या प्रती.

मग आम्हां सर्वांची शर्यत सुरूं होते. टाळतां येणारा कोणताहि शब्द, कोणतंहि जास्तीचं विशेषण, पुनरुक्ति, खोटेपणा, कठिण शब्द, मोठमोठीं वाक्यं आणि एका वाक्यांत जबरदस्तीनं कोंबलेल्या दोन कल्पना – हें सारं शोधायची शर्यत.

एकामागून एक बाहेरच्या लोकांना आम्हीं बोलावतों. ते फार शिकलेले नसतील तर अधिक बरं. आम्हीं त्यांना मोठ्यानं वाचायला सांगतों. आणि आम्हांला जें म्हणायचं होतं तें त्यांना समजलं आहे का ह्याच्याचवर डोळा ठेवून राहतों.

त्यांच्या सूचना आम्हीं स्वीकारतों - त्यामुळं मूळ लिखाण जास्ती स्पष्ट होत असेल तरच. सावधगिरीच्या नांवाखालीं केलेल्या साऱ्या सूचना आम्हीं नाकारतों.

ही सारी मेहनत केल्यावर आणि कुणालाहि वापरतां येतील असे हे नियम पाळल्यावर आमची एखाद्या विचारवंत मूर्खाशीं गांठ पडते. आणि तो जाहीर करतो, "या पत्राला अगदीं डोळ्यांत भरण्याजोगी व्यक्तिगत शैली आहे."

**आळशीपणा** लेखनकला म्हणजे काय हें आपल्याला माहीत नाहीं हें तुम्हीं कबूल कां करत नाहीं? ही कला म्हणजे आळशीपणाचं अगदीं विरुद्ध टोक. आणि आपल्याला यासाठीं वेळ

नाहीं असं सांगूं नका. पुऱ्या वर्षभरांत एक मोठा पेपर लिहिला तरी पुरेसं होईल. पण तो साऱ्या विद्यार्थ्यांनीं लिहिलेला असला पाहिजे.

आळशीपणाचा विषय निघालाच आहे तर तुमच्या विद्यार्थ्यांना रिझवायला एक प्रयोग मी सुचवीन : सैताचं इतिहासाचं पुस्तक अस्सल इटालियनमधें भाषांतर करण्यासाठीं एक वर्ष कां घालवूं नये?

## फौजदारी खटला

तुम्हीं वर्षाकांठीं २१० दिवस काम करतां. त्यांतले तीस जातात परीक्षांमधें. आणि तीस आणखीच्या चांचंण्यांसाठीं. म्हणजे वर्षांमधें शाळेचे दिवस राहिले फक्त १५०. या शाळेच्या दिवसांतले अर्धे तोंडी परीक्षांमधें खर्च होतात. याचा अर्थ असा कीं २१० पैकीं १३५ दिवस निकाल देण्यासाठीं तर उलट फक्त ७५ दिवस शिकवण्यासाठीं.

तुमच्या कामाचा करार जरासुद्धां न बदलतांदेखील शिकवण्याचे तास तुम्हांला तिप्पट करतां येतील.

**वर्गातंच परीक्षा** परीक्षा घेत असतांना डेस्कांच्या रांगांमधून वरपासून खालपर्यंत तुमच्या फेऱ्या चालायच्या. आणि मी अडचणींत आहें, चुका करतों आहें, हें बघूनसुद्धां तुम्हीं कधीं एक चकार शब्द बोललां नाहींत.

घरीं पण तेंच. मदतीसाठीं वळावं असं आसपास मैलोन्‌मैल कुणीच नाहीं. ना पुस्तकं, ना टेलिफोन.

आतां इथं मी ‘शाळेंत’ आहें. शिकावं म्हणून मी अगदी दूरवरून आलों. ‘बरं बाबा, आतां गप्प राहतें’ असं कबूल करून पण शंभरदां मधेंमधें बोलणाऱ्या माझ्या आईला इथं मला तोंड

द्यावं लागत नाहीं. माझा भाचा पण गृहपाठांत मदत मागायला इथं नाहीं. इथं मला शांततां आहे. आणि स्वच्छ प्रकाश आणि एकट्या माझ्यासाठीं असं डेस्क.

आणि समोर कांहीं पावलांवर तुम्हीं उभ्या असतां. या साऱ्या गोष्टी तुम्हांला माहीत असतात. मला मदत करण्यासाठींच तुम्हांला पगार दिला जातो.

पण त्याऐवजीं जणूं कांहीं मी चोरच आहें अशा तऱ्हेनं माझ्यावर पहारा करत तुम्हीं तुमचा वेळ वायां घालवतां.

**सुस्ती आणि भीति** तोंडी परीक्षा म्हणजे कांहीं खरी शाळा नाहीं हें तुम्हीं स्वतःच मला सांगितलंत. "तुझ्या वर्गावर माझा पहिला तास असेल तेव्हां तूं उशिराच्या गाडीनं आलास तरी चालेल. कारण पहिला अर्धा तास मी तोंडी परीक्षाच घेणार आहें."

या परीक्षा चालूं असतांना सगळा वर्ग एकतर सुस्ती नाहींतर भीति यांत बुडालेला असतो. अगदीं त्या मुलाला प्रश्न विचारले जातात तोसुद्धां आपला वेळ फुकट दवडत असतो. तो कशाचा तरी आडोसा घ्यायला बघतो. फारसं समजत नसलेलं तो टाळतो आणि नीट येत असतं त्या गोष्टींवरच भर देत राहतो.

आपला माल कसा विकावा एवढंच आम्हांला समजलं तरी तुम्हांला खूष करण्यासाठीं तेवढंसुद्धां पुरें आहे. गप्प मात्र कधींच बसतां कामां नये. रिकाम्या जागा अर्थहीन शब्दांनीं कशा भराव्या तेवढं एक साधायला हवं आणि सापेग्नोमधले* टीकावजा

---

* सापेग्नो हा इतिहासाचा लेखक. खूप पुस्तकं वाचलेला. त्यांची तुलना करून टीका करणारा. त्यानं लिहिलेलंच पुन्हां उगाळलं कीं शिक्षक खूष.

शेरे पुन्हां बडबडून स्वतःचेच असल्याचं दाखवायचं आणि आपण मूळ वाचलं आहे असा आभास निर्माण करायचा. बस!

**वैयक्तिक मतं** कांहीं 'वैयक्तिक मतं' बोलून दाखवणं हें तर आणखीच चांगलं. या वैयक्तिक मतांना तुम्हीं फार मान देतां. 'माझ्या मतें, पेट्रार्क...' (१४ व्या शतकामधला इटालियन कवि) वगैरे. या मुलानं त्याच्या दोनेकच कविता वाचल्या असतील नसतील.

कांहीं अमेरिकन शाळांतून म्हणे असं चालतं – शिक्षक कांहीं मत देतो. तेव्हां अर्धे विद्यार्थी हात उंचावतात आणि म्हणतात, 'मान्य'. बाकीचे अर्धे म्हणतात, 'अमान्य!' हें चालूं असतांना जोराजोरानं च्यूइंग गम चघळणं चालूंच ठेवून ते बाजू बदलतात.

कुवतीपलीकडच्या गोष्टींवर आपलीं मतं देणारा विद्यार्थी मूर्ख असतो. त्याबद्दल त्याचं कौतुक होऊं नये. आपण शाळेंत जातों तें शिक्षक काय म्हणतो तें समजून घ्यायला.

क्वचित् प्रसंगीं आपलं स्वतःचं असं कांहीं वर्गाला किंवा शिक्षकाला उपयोगीं पडतं. हें स्वतःचं म्हणजे मतबीत नव्हे कीं पुस्तकांतून घेतलेलं कांहीं नव्हे. तर आपल्या स्वतःच्या डोळ्यांनीं घरीं, रस्त्यावर किंवा जंगलांत प्रत्यक्ष पाहिलेली एखादी निश्चित गोष्ट.

**चलाख प्रश्न** अशा गोष्टींबद्दल तुम्हीं मला कधीं प्रश्न विचारलेच नाहींत. आणि मी स्वतः होऊन त्यांच्याबद्दल कधींच कांहीं बोलणार नाहीं. पण तुमचे हे तरुण सद्गृहस्थ मात्र निरागस चेहऱ्यानं आधींच ठाऊक असणाऱ्या गोष्टींबद्दल विचारतच

राहतील, आणि 'काय चलाख प्रश्न!' म्हणून तुम्हीं त्यांना उत्तेजन देतच राहाल.

प्रत्येकालाच निरुपयोगी असा हा फार्स - त्या लाळघोट्यांना धोक्याचा, आणि हा खेळ खेळायला न येणाऱ्या माझ्यासारख्याला क्रूरपणाचा.

**दुसरी मृत भाषा** 'प्रचलित गद्यांत रूपांतर करा' – माझे डोळे फोस्कोला या १९व्या शतकाच्या सुरुवातीला होऊन गेलेल्या इटालियन कवीच्या कवितेवरून भिरभिरत होते. कुठं नजर स्थिर करावी तेंच कळत नव्हतं. तुम्हीं माझ्याजवळ येऊन हंसलांत आणि कुजबुजलांत, "सुरूं कर बाळ! इतकं सोपं आहे हें! कालच तर वर्गांत मीं या साऱ्याची उजळणी केली होती. तूं अभ्यास केलेला दिसत नाहींस."

खरं होतं. मीं अभ्यास केलेला नव्हता. मी माझ्या स्वतःच्या विद्यार्थ्यांना Inaugurare म्हणजे angurare male* हें कधींच शिकवणार नाहीं. तिथं तळटीपेंत तें स्पष्ट केलेलं आहे. पण तें खोटं आहे. फॉस्कोलानं तें रचलं, कारण त्याला गरिबांचा तिटकारा होता. त्याला आमच्यासाठीं कांहीं कष्टच घ्यायचे नव्हते.

ती चमत्कारिक भाषा मला अगदीं आत्मसात् व्हावी म्हणून तुम्हीं या सगळ्या टिपणांची वही ठेवायला सांगितली. ती भाषा मीं शिकावी असं तुम्हीं गृहीत धरलं होतंत. पण मी तिचा उपयोग कुठं करणार?

---

* Inaugurare, उद्घाटन करणं. Augurare male, धोक्याची पूर्वसूचना देणं.

भाषेचे सारे अडथळे ओलांडून डिकच्या पुढं हात करण्यासाठीं मी सगळ्या कसरती करायला तयार होतों. कामाच्या मधल्या सुट्टींत तो माझ्याशेजारीं बसायचा आणि Dolce Vita** म्हणायचा प्रयत्न करायचा. मी पण माझ्या बेकार कॉकनीमधें एखादा ग्राम्य विनोद करून प्रतिसाद द्यायचों. आणि माझे उच्चार त्याच्याइतकेच बिघडवायचा प्रयत्न करायचों. ऑफिसच्या आंत कधींहि बोलली न जाणारी कॉकनी. तुम्हांला गरिबांमधेंच ठेवणारी कॉकनी.

**कचाट्यांत अडकवणं** दरम्यान मिनिटं पुढं सरकत होतीं, आणि माझं तोंड उघडत नव्हतं. मी राग आणि निराशा यांत बुडून गेलों होतों.

तीं केविलवाणीं मुलं मला समजून घेऊं शकत नव्हतीं. तुमच्या मोंतीची भाषा स्वीकारायचं शिक्षण तुम्हीं त्यांना तान्हेपणापासूनच दिलं आहे. या कंटाळवाणेपणाला तीं कधींच शरण गेलीं आहेत. शाळेंत हें असंच असतं असं तीं धरूनच चाललेलीं असतात.

प्रेमळ सहानुभूतीनं तीं मला खुलवायला पाहायचीं. सेंट व्हिन्सेंट चॅरिटेबल सोसायटीच्या तरुण माणसांप्रमाणं त्यांना पण 'खुन्नस' कधीं दिसली नाहीं.

त्यांना मी नकोसा होतों असं नाहीं. तुम्हांलासुद्धां. "मी कांहीं तुला खाऊन टाकणार नाहीं!" तुमचं बोलणं इतकं धीर देणारं वाटत होतं! तुम्हांला माझ्याबद्दलचं आपलं कर्तव्य पार पाडायच होतं.

---

** Dolce Vita हा फेदेरिको फेलिनीचा प्रसिद्ध इटालियन चित्रपट.

आणि तें करत असतांनाच तुमच्या हातांत असलेल्या पदविकेचा धाक घालून माझा प्रत्येक आदर्श तुम्हीं नष्ट करत होतांत.

**कला** आत्तां मित्रांबरोबर बसून हें सगळं लिहून काढतांना मी कसा अगदीं शांत आहें! असं शांत व्हायला तोंडी परीक्षेच्या वेळीं मला जरा जरी अवधी मिळाला असता, तरी मला तुम्हांला हें नक्कींच पटवून देतां आलं असतं. तुम्हीं म्हणजे कांहीं एखादं हिंस्त्र जनावर नाहीं.

त्यावेळीं मात्र माझ्या मनांत फक्त गलिच्छ आणि अपमानकारक शब्दच तेवढे येत होते. वादविवादांत रोखून धरायची आटोकाट धडपड आपण करूं असे शब्द.

तर कला म्हणजे काय हें आम्हांला समजलं आहे. कुणीतरी, काहींतरी निवडणं हा तिचा अर्थ. त्याच्याबद्दल मनन करणं, शांतपणानं सांघिक काम करतांना आपल्या मदतीला मित्र असणं.

कीं मग सावकाश ती खुन्नस बाजूला सारून सत्य बाहेर येईल. एक कलाकृती जन्माला आली आहे - आपला शत्रु बदलावा म्हणून त्याच्यापुढं केलेला हात.

## संसर्ग

तुमच्या शाळेंत एक महिना गेल्यावर मला पण संसर्ग बाधला.

तोंडी परीक्षा चालूं असतांना माझी छाती धडधडण्याचं थांबलं. माझ्या लक्षांत आलं कीं आपल्या वांट्याला जें यायला नको असं मला वाटत होतं, तें इतरांच्या वांट्याला खुशाल येऊं दे असं मला वाटायला लागलं होतं.

मीं वर्गात लक्ष द्यायचं थांबवलं. पुढच्या तासाला होणाऱ्या तोंडी परीक्षांचाच फक्त विचार मी करायला लागलों.

सर्वांत जास्त आवडणारे विषय बंदिस्त आणि निर्जीव झाले. जणूं बाहेरच्या मोठ्या जगाशीं त्यांच्या कांहीं संबंधच नव्हता. जणूं फळा आणि शिक्षिकेचं टेबल यांच्या मधल्या कांहीं इंचांत त्यांना अडकवून ठेवतां येण्याजोगं होतं.

**किडा** घरीं आई आजारी कधीं पडली तें माझ्या लक्षांतच आलं नाहीं. कीं माझ्या शेजाऱ्यांत पण मला कांहीं रस उरला नाहीं. मीं कधीं वर्तमानपत्र वाचलं नाहीं. रात्रींसुद्धां मला झोंप लागेनाशी झाली.

आई रडली. माझे बाबा स्वतःशींच कुरकुरले : "तूं बाहेर जंगलांतच जास्ती चांगला असतोस."

माझी अवस्था म्हणजे एखाद्या किड्यासारखी झाली होती.

एखादी गोष्ट विद्यार्थ्यांना शिकवायची झाली तर अभ्यासासाठीं मी जसा वेळ काढीन, तसाच वेळ तोंपर्यंत मी कोणत्याहि गोष्टीसाठीं देत होतों. कांहीं महत्त्वाचं वाटलं तर अभ्यासाचं पुस्तक टाकून मी तें समजून घ्यायला दुसऱ्या पुस्तकांचा अभ्यास करत होतों.

तुमचे उपचार घ्यायला लागल्यानंतर मात्र मला अभ्यासाचं पुस्तकदेखील भारी वाटायला लागलं. महत्त्वाच्या मुद्यांखालीं मी रेघा मारायला लागलों. नंतर माझ्या शाळासोबत्यांनीं घोकंपट्टींसाठीं मला आणखीच बारकीं पुस्तकं सुचवलीं. तुमच्या छोट्या डोक्यांचं समाधान करण्यासाठींच मुद्दाम तयार झालेलीं.

**संशय** तुमचं बरोबरच आहे आणि तुमची संस्कृति खरीच आहे असं वाटण्यापर्यंत मी आलों. आम्हीं डोंगरदऱ्यांत एकाकी राहणारे आपले भाबडेपणानं स्वप्नं बघतो. पण हा भाबडेपणा तुम्हीं टाकून दिल्याला आतां शेंकडों वर्ष लोटलीं आहेत.

कदाचित् प्रत्येकाला वाचतां येणाऱ्या, साध्यासुध्या शब्दांनीं बनलेल्या भाषेची आमची कल्पना म्हणजे वेळेआधीच पाहिलेलं दिवास्वप्न असेल.

तुमच्यापैकींच एक होण्यापासून मी अगदीं बालबाल बचावलों. नाहींतर वर विद्यापीठांत गेल्यावर आपला वंश बदलणाऱ्या गरीब मुलांसारखाच मी पण होऊन गेलों असतों.

**तिऱ्हाईत** पण तुम्हांला आवडलं असतं तितका बदलायला मला पुरेसा वेळच नव्हता. जूनमधें तुम्हीं मला इटालियनमधें ५ आणि लॅटिनमधें ४ मार्क दिलेत.

पुन्हां एकदां जंगलामधला तो रस्ता मीं धरला आणि बार्बियानाला परतलों. दिवसामागून दिवस, पहांटेपासून रात्रीपर्यंत, पुन्हां एकदां लहानपणींसारखं.

पण तरी शाळेला सगळा वेळ मीं दिला नाहीं. कारण मला या दोन परीक्षा पुन्हां द्यायच्या होत्या. वर्तमानपत्र वाचणं आणि छोट्या विद्यार्थ्यांना शिकवणं यांतून माझ्या शिक्षकानं मला सूट दिली. शांतता मिळावी म्हणून स्वतंत्रपणं एका खोलींत बसायची आणि घरीं नसलेल्या पुस्तकांचा अभ्यास करायची परवानगी पण मला दिली.

मेलेल्या जगांतून मी परतायचों तो फक्त आलेलीं पत्र वाचण्यासाठीं!

## पत्रं

**भीक** अल्जिरियाहून फ्रांकुचिओ

... इथं कांहीं भागांत जमीन अगदीं लाल आहे. आणि गवताचं एक पातंहि नाहीं. एकदम गाडी थांबते. काय झालं तें पाहण्यासाठीं मी खिडकीबाहेर डोकावतों. पायांपर्यंत पोंचणारे रंगीबेरंगी स्कर्ट घातलेल्या तीन मुली. त्या गाडीबरोबर चालतात. त्या भीक मागत नाहींत, पण लोक त्यांच्याकडे कांहीं फेंकतात. तें त्या पटकन् गोळा करतात आणि आपल्या पोलक्यांत दडवतात. गाडीच्या अगदीं शेवटच्या डब्यापर्यंत त्या पोंचल्यानंतर ड्रायव्हर गाडीचा वेग पुन्हां ताशीं तीस किलोमीटरइतका वाढवतो. बेनबेलाला ही भाक मागायची संवय मोडायची होती, पण उलटपक्षीं बॉमेदिएन ती चालूं देतो असं मला कळलं. याचा उलगडा मला अजून होत नाहीं कोण बरोबर? तुमचं काय मत, फादर?

**गरिबांची भाषा** फ्रांकुचिओचं दुसरं पत्र

...रस्त्यावर एक लाकडी कडं मिळालं आणि तें हवेंत उडवून पुन्हां झेलायला मीं सुरवात केली. माझ्याभोंवतीं वीसेक मुलं जमली. त्यांनीं हंसायला सुरवात केली आणि मीं तें त्यांच्याकडे फेंकावं म्हणून त्यांनीं हात वर केले. मीं तसं केलं आणि एकहि शब्द न बोलतां पांच मिनिटं हा खेळ सुरूं होता. एकाएकीं त्यांच्यांतल्या मोठ्या मुलानं थांबायची खूण केली. त्यानं माझं अरेबिक वृत्तपत्र पाहिलं आहे. तूं कुठून आलास आणि इथं काय करतो आहेस, असं त्यानं मला अरेबिकमधें विचारलं. बाजूच्या छोट्या मशिदीच्या पायऱ्यांवर आम्हीं बोलायला सुरवात केली. मौलवी आमच्याजवळ आला आणि माझ्याशीं भराभर

बोलायला लागला. मला त्याचे प्रश्न कळेनात. आणि मी अरब नाहीं पण मला फक्त अरेबिक वाचतां येतं, हें मला कबूल करावं लागलं. नंतर कुराण पढण्यासाठीं त्यानं मला मशिदींत नेलं. तो अगदीं उचंबळून आला होता.

**धर्म** फ्रान्समधून सांद्रो
त्यानं बाजूच्या रस्त्यावर गाडी थांबवली आणि गाडींत बसल्याबद्दल माझ्याकडे पैसे मागितले. 'मी कॅथॉलिक आहें, महाशय!' – मी म्हणालों. त्यानं नाद सोडून दिला. मी गोंधळून गेलों होतों. पण मला तिथंच सोडून दिलं त्यानं. आणि हमररस्त्यावर पोंचण्यासाठीं मला चार किलोमीटर चालावं लागलं.

**उकळलेलीं सूर्यफुलं** वेल्समधून फ्रांको
पापांची कबुली द्यायला आलेल्या परकीयांसाठी धर्मोपदेशकां-जवळ खास पुस्तिका आहे. तुम्हीं त्याला सांगतां 'मी २५ नंबरचीं दोन पाप केलीं, आणि १२ नंबरच्या तीन पापांबरोबर झगडलों.' त्यानं मला २५ नंबरवर नीतिपाठ दिला.

मी ह्या लहानुखुऱ्या म्हातारीसाठीं भाजी पिकवतों. आज अख्खा दिवसभर मला सूर्यफुलं खुडावीं लागलीं. ती शाकाहारी आहे. पण माझ्या एकट्यासाठीं म्हणून तिनं मांस विकत घेतलं असतं. मी नको म्हणालों. आणखी एक अनुभव. म्हणून मग तिनं दोन सूर्यफुलांचे देठ उपटले आणि माझ्यासाठीं ते शिजवले.

**राजकारणाबद्दल उदासीन मुलगी** मार्सायहून कार्लो
... इथं एका धर्मोपदेशकांबरोबर इटालियन विद्यार्थ्यांचा एक गट आहे. ते पगार न घेतां अल्जिरिअनांसाठीं बराकी बांधतात.

फ्रेंच शिकायचा उद्योग ते मुळींच करत नाहींत. त्यांना राजकारणाबद्दल कांहीं ऐकायचं नाहीं. व्हॅटिकन सल्लागार मंडळाबद्दल मात्र ते चिकार बडबड करतात, पण प्रत्यक्ष काम फारच कमी करतात. त्यांच्यापैकीं एक आहे अगदीं मूर्ख मुलगी. आज रात्रीं तुम्हांला पत्र लिहिण्यासाठीं म्हणून मी माझ्या खोलींत गेलों, तर ती माझ्यापाठोपाठ आली आणि फ्लोरेन्सचे पुरुष आपल्याला अगदीं वेड लावतात असं म्हणून तिनं स्वतःला माझ्या बिछान्यावर झोंकून दिलं.

**खोट्याची स्तुति** लंडनहून एदोआदों

... हा सगळा दोष आपल्या मुलांचे अति लाड करणाऱ्या पालकांचा आहे. ते त्यांना पैसे कसे खर्चावे हें शिकवत नाहींत. मुलं चक्क आई-बापांच्यावर हुकमत गाजवतात. आणि आईवडील त्यांना प्रौढांप्रमाणंच वागवतात. याच्या बदल्यांत पालकांना मुलांचा विश्वास मिळतो. मुलाला वाईट गोष्टींपासून दूर ठेवण्या-साठीं एखादेवेळीं खोटंसुद्धां बोललं तरी त्यांत एवढं गैर काय आहे? माझ्या मनांतलं मला स्वच्छपणानं सांगतां आलं आहे कीं नाहीं कोण जाणें. तशी इंग्रज मुलं फार प्रामाणिक आहेत. पण कांहीं केलं तरी त्यांची आई त्यांना कधींच रागावत नसेल तर मग ह्या प्रामाणिकपणाला तरी काय किंमत?

आणि पालकांना तरी ह्यांतून काय मिळतं? समजा, खोटं बोललों तर आपलं काय चुकल हें मला माहीत असल्याची ती निशाणी असते. आणि पुन्हां तशी चूक करण्याआधीं मी दहा वेळां विचार करीन.

**आमच्या जमेला** कामगार संघटनेचा जुना कार्यकर्ता इंग्लंडहून पाब्लोबद्दल लिहितो :

..... पाब्लो म्हणजे जणूं ईश्वराकडून आमच्या कारखान्याला मिळालेलं वरदान आहे. आणि तुमच्या शाळेचं खरं भूषण. जीवनाबद्दल तो इतका जागरूक आणि आनंदी आहे! मला वाटतं ही गोष्ट ईश्वरानंच घडवून आणलेली आहे. तुम्हीं आणि मी - एकमेकांपासून आपण इतक्या दूर अंतरावर आहोंत, आणि तरीही आपण बोलतों आणि विचार करतों तो सारखेपणानं. इथं कितीतरी कामगार हुजूर पक्षाला मत देतात. आणि साहेबाचं वर्तमानपत्र वाचतात. आणि मी त्यांना सांगतों, 'हा मुलगा इटालीपासून इथवर येईपर्यंत माझ्यासारखंच विचार करणारं कुणी मिळायला मला थांबावं लागलं. एक मुलगा - आणि तो पण रोमन कॅथॉलिक - इथं येतो आणि तुम्हांला चक्क शिकवतो!'*

**ॲनिबाल कारो** सगळीं पत्र वाचून झालीं कीं पुन्हा मी 'इनिड' घेऊन स्वतःला कोंडून घेतों.

तुम्हांला आवडणारं उपाख्यान मी वाचतों.

---

* आंतरराष्ट्रीय करारानं १८ वर्षांच्या खालच्या मुलांना परदेशीं जाऊन काम करायला मनाई केलेली आहे. पण कामगार कायदे फक्त इटालींतच मोडले जातात असं नाहीं. बार्बियानाच्या मुलांनीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, अल्जीरिया, लिबिया या देशांत कामं केलीं आहेत. उदाहरणार्थ, हीं पत्रं लिहिणारीं मुलंच पहा : 'फ्रांकुचिओ १६ वर्षांचा आहे, सांद्रो १५ वर्षांचा, फ्रांको १४, कार्लो १६, एदोआर्दो १६.

लोक झोंपले असतांना दोन अत्याचारी गुंड त्यांचे कोथळे बाहेर काढत असतात. यादी : कोथळे काढलेलीं माणसं, चोरलेल्या वस्तू, बक्षीस म्हणून कमरपट्टे दिलेल्या माणसांचीं नांवं आणि प्रत्येक पट्टयाचं वजन. सगळी गोष्ट एका जन्मतःच मेलेल्या भाषेंत. इटालियन शाळांत 'इनिड' वाचलं जातं तें ॲनिबाल कारो या १६व्या शतकांतल्या लेखकानं केलेल्या भाषांतराच्या स्वरूपांत!

'इनिड' हा कांही अभ्यासक्रमाचा भाग नव्हता. तुम्हीं तें निवडलंत. याबद्दल मी तुम्हांला कधींच माफ करणार नाहीं.

माझे मित्र मात्र मला माफ करतात. त्यांना ठाऊक आहे, शिक्षक होणं हें माझं ध्येय आहे. पण तुमच्यासारखाच मी पण वास्तवापासून तुटलेला आहें.

## निर्जंतुकीकरण

**उथळ** सप्टेंबरांत तुम्हीं दोन्ही परीक्षांत मला चौथी श्रेणी दिलीत. आपल्या औषधविक्रेत्याचा धंदा पण तुम्हांला नीटपणानं करतां येत नाहीं. तुमचीं वजनं बरोबर नाहींत. जूनमधें येत होतं त्यापेक्षां आतां मला कमी कसं यायला लागलं?

तुम्हीं एक विजेचं बटण दाबलं आणि एका मुलाला नाहींसं केलं, पण प्रत्यक्षांत नकळत तुम्हीं माझा दिवा लावलांत. तुम्हीं आणि तुमची संस्कृति याबद्दल माझे डोळे उघडलेत.

सगळ्यांत पहिलं म्हणजे तुमचं वर्णन करणारा अचूक, अपमानकारक शब्द मला सांपडला आहे. तुम्हीं केवळ 'उथळ' आहांत. तुम्हीं म्हणजे 'अहो रूपम् अहो ध्वनिम्' करणाऱ्यांचा समुदाय. तुमचा समाज आज तगून आहे कारण तुम्हीं अगदीं थोडें आहांत.

**सूड** माझे बाबा आणि भाऊ माझ्यासाठीं जंगलांत जातात. मला पुन्हां ती वाट धरतां येत नाहीं. आणि जगाला आपल्या वाटेनं जाऊ दे असं म्हणून पाठीवरून सर्पण वाहात राहायची माझी तयारी नाहीं. कारण मग तर तुम्हांला जास्तीच बरं वाटेल.

तेव्हां मी पुन्हां बार्बियानाला परत गेलों आणि जूनमधें पुन्हां परीक्षेला बसलों.

जमिनीवर थुंकावं तसं याहि खेपेला तुम्हीं मला पुन्हां नापासच केलंत. तरी मी सोडून देणार नाहीं. मी शिक्षक होणारच – आणि तुमच्यापेक्षां जास्ती चांगला शिक्षक होणार.

**दुसरा सूड** मी उगवत असलेला दुसरा सूड म्हणजे हें पत्र. आम्हीं सार्‍यांनीं मिळून यावर काम केलं आहे.

अगदी गियानीनंसुद्धां. त्याचे वडिल इस्पितळांत आहेत. फक्त आतां आहे तसा गियानी गेल्या वर्षी मर्द असता तर! पण आतां आणखी शिकायला त्याला फार उशीर झाला आहे. शिकाऊ उमेदवार म्हणून त्याला मिळणार्‍या पगाराची त्यांना घरीं गरज आहे. या पत्राचं त्याच्या कानांवर गेलं तेव्हां त्यानं दर रविवारीं यायचं नि मदत करायचं कबूल केलं.

अखेर तो आला, त्यानं पत्र वाचलं. फार कठिण वाटणारे कांहीं शब्द आणि वाक्यं त्यानं दाखवून दिलीं. तुमच्या कांहीं बोंचर्‍या, विशेष खुनशीपणाच्या गोष्टींची आठवण त्यानं आम्हांला करून दिली. त्याची टिंगल करायची परवानगीदेखील त्यानं आम्हांला दिली. खरा तर ह्या पत्राचा मुख्य लेखक तोच आहे.

पण म्हणून कांहीं तुम्हीं  समाधान मानूं नका. गियानींची ठसठसती आठवण तुम्हांला मनांत बाळगायलाच हवी. आपल्याला काय वाटतं तें अजुनी त्याला स्पष्ट नाहीं सांगतां येतं.

**उत्तराची वाट** आतां आम्हीं इथं उत्तराची वाट पाहतों आहोत. कोणत्यातरी माजिस्त्रालेमधें कुणीतरी नक्की निघेलच आम्हांला उत्तर लिहिणारा –

प्रिय मुलांनो,
सगळेच शिक्षक कांहीं तुमच्या त्या बाईंसारखेच नसतात. तुम्हीं स्वतःच वंशवादी होऊं नका.

तुमचं प्रत्येकाचं म्हणणं मला पटलं असं नाहीं, पण तरीहि आमची शाळा कांहीं हवी तितकी चांगली नाहीं हें मला ठाऊक आहे. नवीन लोक आणि नव्या संस्कृतींना मज्जाव फक्त परिपूर्ण शाळाच करूं शकेल. आणि अशी परिपूर्ण शाळाच नाहीं. ना तुमची, ना आमची.

मात्र तुमच्यापैकीं ज्या कुणाला शिक्षक व्हायचं असेल त्यानं इथं येऊन परीक्षा दिल्या, तर तुमच्याखातर बाकीच्या गोष्टींकडे डोळेझांक करणारे सहकारी माझ्याजवळ आहेत.

अध्यापनशास्त्रांत आम्हीं तुम्हांला फक्त गियानीबद्दल विचारूं–साहित्याच्या प्रश्नपत्रिकेंत 'तुम्हीं  हें सुंदर पत्र कसं लिहिंलं' तें आम्हीं विचारूं. लॅटिनमधें तुमचे आजोबा अजुनी वापरत असलेले कांहीं पुराणे शब्द, भूगोलांत इंग्रज शेतकऱ्यांचे रिवाज, इतिहासांत डोंगरी लोक सपाटीवर कां आले त्यांची कारणं. शास्त्रांत तुम्हीं आम्हांला 'सोर्मेंती' बद्दल सांगा आणि चेरीचीं

फळं ज्या झाडावर लागतात त्याचं अचूक नांव. – आम्हीं वाट पाहतों आहों ती या अशा पत्राची. आम्हांला विश्वास आहे कीं तें येईल.

आमचा पत्ता :
स्कुओला दि बार्बियाना
व्हिच्चिओ, म्युगेल्लो,
फिरेन्झे, इटाली

*नवा पत्ता :
रागाझ्झी दि बार्बियाना
व्हिया देल कोल्ले ५१
कालेंझानो-फिरेन्झे, इटाली

---

* हें मराठी पुस्तक वाचणाऱ्यांपैकीं कुणीं पत्र लिहिलं तर तें इंग्रजींत लिहावं. ह्या मंडळींना इंग्रजी येतं. पत्ता तर अर्थातच इंग्रजींत लिहावा लागेल : Ragazzi di Barbiana, Via del Colle 51 Calenzano-Firenze, Italy.